मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ अंक : २७३ मंगळवार, १६ जून २०२६ किंमत : २ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# रायगड जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशोत्सव उत्साहात; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ‘आयडियल सेंटर डिजिटल लॅब’चे उद्घाटन

## वहाळ येथील पीएमश्री शाळेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती; डिजिटल शिक्षण व मूल्यशिक्षणावर भर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** उन्हाळ्याची सुट्टी संपल्यानंतर नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी रायगड जिल्हा परिषद शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात, फुलांची उधळण करून आणि औक्षणाने स्वागत करण्यात आले. जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये राबविण्यात आलेल्या या उपक्रमांमुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रवेशोत्सवाचे मुख्य आकर्षण पनवेल तालुक्यातील पीएमश्री रायगड जिल्हा परिषद शाळा, वहाळ येथे पाहायला मिळाले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शाळेला भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांच्या हस्ते अत्याधुनिक ‘आयडियल सेंटर डिजिटल लॅब’चे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर मुख्यमंत्र्यांनी प्रयोगशाळेची पाहणी करून तिची कार्यपद्धती जाणून घेतली.या




कार्यक्रमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शालेय शिक्षण प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, जिल्हाधिकारी किशन जावळे, ज्येष्ठ नेते माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्यासह अनेक स्थानिक लोकप्रतिनिधी, उपस्थित होते.

या डिजिटल लॅबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दृकश्राव्य पद्धतीने





शिक्षण मिळणार असून, सर्व वर्गांचा अभ्यासक्रम डिजिटल स्वरूपात उपलब्ध करण्यात आला आहे. त्यामुळे अध्यापन अधिक प्रभावी, रंजक आणि सुलभ होणार आहे.



ऑनलाईन परीक्षा प्रणालीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक कौशल्यांचा विकास होण्यास मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### इयत्ता चौथीच्या विद्यार्थिनीने घेतली मुख्यमंत्र्यांची मुलाखत

पीएमश्री रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वहाळ येथे आयोजित शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमात एक अनोखा आणि प्रेरणादायी क्षण अनुभवायला मिळाला. शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थिनीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची थेट मुलाखत घेत उपस्थितांची मने जिंकली. आत्मविश्वासाने विचारलेल्या प्रश्नांमधून विद्यार्थिनीने शिक्षण, सामाजिक कार्य, नेतृत्व आणि डिजिटल युगातील बदलांविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केला.मुख्यमंत्र्यांनीही विद्यार्थिनीच्या प्रश्नांना मनमोकळेपणाने उत्तरे देत आपल्या विद्यार्थी जीवनापासूनच्या सार्वजनिक प्रवासाची माहिती दिली. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांतून प्रेरणा घेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. तसेच डिजिटल शिक्षण हे भविष्यातील शिक्षण व्यवस्थेचा महत्त्वाचा आधार असल्याचे सांगितले.विद्यार्थिनीने घेतलेली ही मुलाखत शाळा प्रवेशोत्सवाचे विशेष आकर्षण ठरली. मुख्यमंत्र्यांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.


राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये अशा प्रकारच्या डिजिटल लॅब उभारण्याचे काम वेगाने सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली. मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या ज्ञानाची आणि शैक्षणिक प्रगतीची माहिती घेतली. विद्यार्थ्यांची शिस्त, आत्मविश्वास आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करत जिल्हा परिषद शाळांमधील गुणवत्तावाढीमुळे पालकांचा सरकारी शाळांवरील विश्वास दृढ होत असल्याचे नमूद केले. आपल्या भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मूल्याधारित शिक्षणावर विशेष भर दिला. विद्यार्थ्यांमध्ये संवैधानिक मूल्ये, स्वच्छतेच्या सवयी, पर्यावरण संवर्धनाची जाणीव तसेच सामाजिक जबाबदारी विकसित होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणासोबतच सुजाण आणि जबाबदार नागरिक घडविण्याचे कार्य शासन करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.









# शब्दश्री विलास देवळेकर यांचा कोकण भूषण पुरस्काराने सत्कार !

**दैनिक युवक आधार**
**मुबंई प्रतिनिधी :** नुकताच मुंबईत दादर येथील मुंबई मराठी संग्रहालयातील प्रा. सुरेंद्र गावस्कर सभागृहात मुंबई व कोकणात लोकप्रिय 'कोकण दीप' मासिकाचे यंदा "२४वा वर्धापन दिनानिमित्त व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण" सोहळयात, सुरुवातीला देवळेकर रचना आणि गायक व संगीतकार एकनाथ धयाळकर यांच्या आवाजात मनोरंजन व प्रबोधनात्मक आणि कोकण दीप 'स्वागत गीत' ध्वनी मुद्रित सादर केले. त्यानंतर, प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून, सरस्वती प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, मान्यवरांचे साहित्य मंचावर आसन ग्रहण झाल्यावर शब्दश्री विलास देवळेकर यांनी आपल्या "म्युझिकल




इक्को साऊंड सिस्टीम मध्ये मालवणी गाऱ्हाणा" सादर केला. त्यास उत्स्फूर्त प्रतिसादात टाळयांच्या कडकडाटात स्वागत करण्यात आले. देवळेकर यांच्या "सामाजिक व साहित्य कार्याची" दखल घेत, प्रमुख पाहुणे सुधीरभाऊ कदम (शिवसेना संपर्क प्रमुख, दापोली विधानसभा), डॉ सुकृत खांडेकर (जेष्ठ पत्रकार, माजी संपादक), प्रवीण घाग (गिरणी कामगार नेता), बाळासाहेब तोरसकर (जेष्ठ साहित्यिक व कवी) आणि सौ. मिनाक्षी विनय शेडगे यांच्या हस्ते "कोकण भूषण पुरस्काराने" सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आले. तसेच, देवळेकर लिखित ६ फुट 'कविता फ्लेक्स' सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. काही जणांनी त्या सोबत फोटोही काढले आहेत. आणि उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रशांत महाडिक यांनी केले.

# राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने प्रा. अशोक काळे यांचा गौरव

**दैनिक युवक आधार**
**अंभोरा प्रतिनिधी :** आष्टी तालुक्यातील भोजेवाडी येथील प्राध्यापक अशोक काळे यांना राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सर्वत्र त्याचे अभिनंदन होत आहे.

आधार फाउंडेशन व एस एम २४ न्यूज यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळयात प्राध्यापक अशोक काळे यांना "राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार" प्रदान करून गौरविण्यात आले. शैक्षणिक, सामाजिक, प्रबोधनात्मक व समाजहिताच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा मानाचा पुरस्कार



देण्यात आला.

हा पुरस्कार आधार फाउंडेशनच्या अध्यक्षा ह.भ.प. राधिकाताई खेमनर, एस एम २४ न्यूजचे संपादक रमेशजी खेमनर तसेच पोलीस उपआयुक्त आण्णासाहेब हंडाळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ आणि पुरस्कारार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. अशोक काळे यांनी आपल्या शैक्षणिक कारकिर्दीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य केले आहे. शिक्षण क्षेत्रासोबतच समाजप्रबोधन, सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम, युवकांना मार्गदर्शन तसेच विविध जनजागृती मोहिमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना व युवकांना प्रेरणा मिळाली असून समाजात सकारात्मक बदल घडविण्यास हातभार लागला आहे.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्रा. काळे यांनी हा सन्मान आपल्या कुटुंबीय, सहकारी, विद्यार्थी, मित्रपरिवार आणि समाजातील सर्व शुभेच्छुक यांना समर्पित असल्याची भावना व्यक्त केली. तसेच समाजोपयोगी कार्याची प्रेरणा यापुढेही कायम ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रा. अशोक काळे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्याचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

प्रा. अशोक काळे यांना प्राप्त झालेल्या या प्रतिष्ठेच्या राज्यस्तरीय पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याचा गौरव झाला असून परिसरात त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिक्षण व समाजसेवा या दोन्ही क्षेत्रांत त्यांनी केलेल्या कार्याची ही महत्त्वपूर्ण पोचपावती मानली जात आहे

# स्मार्ट मीटर : जनहिताचा प्रकल्प की ग्राहकांवर आर्थिक भार ?

**दैनिक युवक आधार**
**संपादक डॉ. संतोष शिवदास आमले :** गोवा राज्य सरकारने स्मार्ट मीटर प्रकल्पाला तात्पुरता ब्रेक लावण्याचा घेतलेला निर्णय संपूर्ण देशासाठी चिंतनाचा विषय ठरला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वीज वितरण अधिक कार्यक्षम करण्याचा उद्देश असला तरी नागरिकांच्या वाढत्या तक्रारी, वाढीव वीजबिले आणि दंड आकारणीच्या घटनांमुळे या प्रकल्पाविषयी अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

स्मार्ट मीटर ही संकल्पना कागदावर आकर्षक वाटते. वीज वापराचे अचूक मोजमाप, रिअल-टाईम माहिती आणि वितरण व्यवस्थेतील सुधारणा यासाठी या तंत्रज्ञानाची मांडणी करण्यात आली. मात्र प्रत्यक्षात अनेक राज्यांमध्ये नागरिकांनी वाढीव बिलांच्या तक्रारी केल्या आहेत. गोव्यात तर परिस्थिती इतकी गंभीर झाली की मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना स्वतः हस्तक्षेप करून स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया थांबवावी लागली.

प्रश्न केवळ स्मार्ट मीटरचा नाही, तर नागरिकांच्या विश्वासाचा आहे. कोणत्याही सार्वजनिक प्रकल्पाच्या यशासाठी लोकांचा सहभाग आणि




विश्वास अत्यंत महत्त्वाचा असतो. जर नागरिकांना त्यांच्या वीजबिलात अचानक वाढ जाणवत असेल, त्यांना बिलिंग प्रक्रियेबाबत पुरेशी माहिती दिली जात नसेल किंवा त्यांच्या शंकांचे समाधान होत नसेल, तर अशा प्रकल्पाला विरोध होणे स्वाभाविक आहे.

पनवेलसह महाराष्ट्रातील अनेक भागांमध्येही स्मार्ट मीटरबाबत नागरिकांच्या मनात संभ्रमाचे वातावरण आहे. अनेक ग्राहकांना भविष्यात प्रीपेड पद्धती लागू होईल का, वीजबिले वाढतील का, तांत्रिक बिघाड झाल्यास जबाबदारी कोणाची असेल, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप स्पष्टपणे मिळालेली नाहीत. महावितरण आणि संबंधित यंत्रणांनी याबाबत जनजागृती करणे अपेक्षित असताना अनेक ठिकाणी माहितीचा अभाव दिसून येतो.

शासनाने कोणताही तांत्रिक प्रकल्प राबविताना केवळ आकडेवारी आणि धोरणे न पाहता सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होणाऱ्या परिणामांचाही विचार करणे आवश्यक आहे. स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांचे हित सुरक्षित राहील, वीजबिले पारदर्शक राहतील आणि कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही याची ठोस हमी प्रशासनाने द्यायला हवी.

गोवा सरकारने नागरिकांच्या तक्रारी गांभीर्याने घेत तपासणीचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्र शासनानेही त्यातून धडा घेण्याची गरज आहे. जनतेच्या शंकांचे निरसन, स्वतंत्र तांत्रिक पडताळणी आणि पारदर्शक माहितीशिवाय स्मार्ट मीटरची सक्ती करणे योग्य ठरणार नाही.

आज गरज आहे ती विकास आणि जनहित यांच्यातील समतोल साधण्याची. स्मार्ट मीटर हा प्रकल्प नागरिकांच्या सुविधेसाठी असेल तर त्याचे स्वागत व्हायलाच हवे; परंतु जर त्यातून ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असेल, तर शासनाने जनभावनांचा आदर करून फेरविचार करणे हीच लोकशाहीची खरी कसोटी ठरेल.-

# तळोजा पेंधर गावातील जिल्हा परिषद शाळेची दोन वर्षांपासून दुरवस्था

## 350 हून अधिक विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला

**दैनिक युवक आधार**
**अक्षय कांबळे तळोजा,वार्ताहर :** एकीकडे सरकार "बेटी बचाव, बेटी पढाव" तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विविध योजना आणि उपक्रम राबवत असल्याचा दावा करत आहे. मात्र दुसरीकडे तळोजा पेंधर गावातील जिल्हा परिषद शाळेची अवस्था गेल्या दोन वर्षांपासून अत्यंत दयनीय झाली असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शेकडो विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि पालकांनी केला आहे.

शाळेची इमारत धोकादायक घोषित झाल्यानंतर विद्यार्थ्यांसाठी तात्पुरती पर्यायी व्यवस्था करण्यात आली. मात्र शाळा व्यवस्थापन समितीकडून रायगड जिल्हा शिक्षणाधिकारी, पंचायत समिती शिक्षणाधिकारी आणि पनवेल महानगरपालिका शिक्षण विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे समोर आले आहे.

सध्या विद्यार्थ्यांना मंदिर तसेच इतर



खासगी ठिकाणी शिक्षण घ्यावे लागत असून वर्गखोल्यांच्या अभावामुळे शिक्षण व्यवस्थेवर मोठा परिणाम होत आहे. तब्बल दोन वर्षांचा कालावधी उलटूनही शाळेची दुरुस्ती किंवा नवीन इमारत उभारण्याबाबत कोणताही निर्णय झालेला नसल्याने पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावर्षी शाळेत 150 हून अधिक नवीन प्रवेश झाले असून एकूण विद्यार्थी संख्या 350 च्या पुढे गेली आहे. एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत असताना त्यांच्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे.

गावकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने पर्यायी शैक्षणिक व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. तसेच नवीन शाळा इमारत किंवा दुरुस्तीच्या कामाला त्वरित मंजुरी देण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश लक्ष्मण भोईर, वसंत महादू पाटील, राम कमलाकर खेरणेकर, वैशाली राम खेरणेकर, शिक्षक, कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश भोईर यांनी प्रशासनाला इशारा देत म्हटले की, "शाळेच्या प्रश्नावर तातडीने कार्यवाही झाली नाही तर पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांसह तीव्र ठिय्या आंदोलन छेडण्यात येईल."

आता विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा हा गंभीर प्रश्न सरकार आणि प्रशासन कोणत्या पद्धतीने सोडवते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# नवी मुंबईत प्रथमच दुर्मिळ हृदयरोगावर उपचार; ७१ वर्षीय महिलेची ओपन हार्ट सर्जरी टळली

## मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये 'अल्कोहोल सेप्टल ॲब्लेशन' ही यशस्वी शस्त्रक्रिया

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई :प्रतिनिधी :** गंभीर हृदयविकाराने त्रस्त असलेल्या ७१ वर्षीय महिलेवर नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यात प्रथमच 'अल्कोहोल सेप्टल ॲब्लेशन' (Alcohol Septal Ablation) ही अत्याधुनिक, मिनिमली इन्व्हेसिव्ह उपचारपद्धती यशस्वीपणे करण्यात आली. मेडिकव्हर हॉस्पिटलमधील वरिष्ठ इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. केशव काळे यांच्या नेतृत्वाखाली ही प्रक्रिया पार पडली. या उपचारामुळे उच्च जोखमीची ओपन हार्ट सर्जरी टळली असून रुग्णेला सुरक्षितपणे आराम मिळाला आहे.

नेरूळ येथील ७१ वर्षीय श्रीमती विमल शिंदे (नाव बदलले आहे*)* या गेल्या काही वर्षांपासून हायपरट्रॉफिक ऑब्स्ट्रक्टिव्ह कार्डिओमायोपॅथी (HOCM) या गंभीर हृदयविकाराने त्रस्त होत्या. छातीत तीव्र वेदना, श्वास घेण्यास त्रास, तीव्र थकवा आणि चालताना अडचण अशा लक्षणांमुळे त्यांचे दैनंदिन जीवन अत्यंत कठीण झाले होते. सर्व औषधोपचार करुनही त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत नव्हती. अगदी घरातील किरकोळ कामं किंवा थोडे अंतर चालणेही त्यांच्यासाठी आव्हानात्मक झाले होते.

डॉ. केशव काळे म्हणाले,* रुग्णाला



उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हायपरट्रॉफिक ऑब्स्ट्रक्टिव कार्डिओमायोपॅथी (HOCM) हा एक अनुवांशिक (आनुवंशिक) हृदयविकार होता. ज्यामध्ये हृदयाचे स्नायू असामान्यपणे जाड आणि कडक होतात आणि या स्नायूंच्या जाडीमुळे मुख्यत्वे हृदयातून रक्त बाहेर पडणाऱ्या मार्गात अडथळा निर्माण होतो (ऑब्स्ट्रक्शन), ज्यामुळे हृदयाला संपूर्ण शरीरात रक्त पंप करणे कठीण होते. त्यामुळे छातीत दुखणे, धाप लागणे, चक्कर येणे, हृदयाचे अनियमित ठोके, बेशुद्ध पडणे, हृदय निकामी होणे किंवा अचानक मृत्यूचा धोका निर्माण होऊ शकतो.

इकोकार्डिओग्राम, अँजिओग्राफी आणि कार्डियाक एमआरआयसारख्या तपासण्यांमध्ये रुग्णाच्या हृदयातील लेफ्ट व्हेंट्रिक्युलर आउटफ्लो ट्रॅक्ट (LVOT) मध्ये १०० मिमी एचजीपेक्षा जास्त

## गंभीर हृदयविकारावर केली मात

दाबाचा गंभीर अडथळा असल्याचे आढळून आले. सर्व औषधोपचार करूनही हा अडथळा कायम होता. सुरुवातीला 'सेप्टल मायेक्टॉमी' ही ओपन हार्ट सर्जरी करण्याचा विचार करण्यात आला. मात्र रुग्णाचा वय व इतर आजार तसेच गंभीर शस्त्रक्रियेचा धोका लक्षात घेता हा पर्याय अत्यंत धोकादायक होता.

याबाबत डॉ. काळे म्हणाले,* रुग्णाची परिस्थिती गंभीर होती. त्यामुळे आम्ही अल्कोहोल सेप्टल ॲब्लेशन ही दुर्मिळ आणि तांत्रिकदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक उपचारपद्धती निवडली. ही प्रक्रिया नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यात प्रथमच करण्यात आली. भूल देऊन करण्यात आलेल्या या उपचारात हृदयातील जाड झालेल्या स्नायूंना रक्तपुरवठा करणारी विशिष्ट धमनी शोधून त्यामध्ये नियंत्रित प्रमाणात ९५ टक्के अल्कोहोल इंजेक्ट करण्यात आले. यामुळे त्या भागातील स्नायूंची जाडी कमी होऊन रक्तप्रवाह सुधारण्यास मदत झाली.

उपचारादरम्यान अतिरिक्त सुरक्षेसाठी तात्पुरता पेसमेकरही बसविण्यात आला. सुमारे दोन तास चाललेल्या या प्रक्रियेनंतर हृदयातील अडथळ्याचा दाब जवळपास ७० टक्क्यांनी कमी झाल्याचे दिसून आले. कोणतीही गंभीर गुंतागुंत न होता रुग्णेच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली. उपचारानंतर अवघ्या दोन दिवसांत त्यांना आराम मिळाला आणि तीन दिवसांनी त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले.

रुग्णाच्या कुटुंबीयांनी सांगितले की,* आईला चालणे, जिने चढणे यासारख्या साध्या गोष्टींसाठीही खूप त्रास होत होता. ओपन हार्ट सर्जरीला धोका असल्याचे समजल्याने आम्ही घाबरलो होतो. मात्र मेडिकव्हर हॉस्पिटलमधील यशस्वी उपचारानंतर आता आईला मोकळा श्वास घेता येत आहे आणि दिवसेंदिवस तिच्या प्रकृती सुधारणा दिसून येत आहे.

नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलचे केंद्र प्रमुख संदीप जोशी म्हणाले,* अत्यंत गुंतागुंतीच्या आणि दुर्मिळ हृदय उपचार यशस्वीपणे हाताळणे हे आमच्या प्रगत कार्डिओलॉजी सेवेचा मुख्य उद्देश आहे. विविध तज्ज्ञांचा समन्वय साधत योग्य वेळी घेतलेला निर्णय आणि तज्ज्ञांचे कौशल्यामुळे गंभीर आजाराने पिडीत रुग्णांना नवे आयुष्य मिळते.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा बुधा येथे विस्तार अधिकारी म्हणता यांची सदिच्छा भेट

**दैनिक युवक आधार**
**राजू शिंदे महाराष्ट्र उपसंपादक :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथे शाळा प्रवेशोत्सव आनंदात साजरा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथे सन 2026-27 अंतर्गत इयत्ता पहिलीच्या प्रवेश पात्र विद्यार्थ्याचे तालुक्याचे गटविकास अधिकारी सन्माननीय श्री गगन बोने साहेब व शिक्षण विस्तार अधिकारी श्री के जी राठोड सर यांच्या हस्ते नवागताचे पुष्प ,फुगे ,पुस्तक व गणवेश देऊन स्वागत करण्यात



आले . यावेळी मुख्याध्यापक श्री विजय कांगणे सर स. शि. श्री निलेश पिसे सर श्री पंजाब दांदडे सर शाळा व्यवस्थापन समिति ग्रामपंचायत कार्यालय व पालक यांची उपस्थिती होती.

# नगरसेविका शिवानी घरत यांच्या मागणीला यश ; लवकरच सुरू होणार रेल्वे स्टेशन परिसरातील पोलीस चौकी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** गेल्या काही महिन्यापासून पनवेल रेल्वे स्टेशन समोर असलेली पोलीस चौकी विविध कारणांमुळे बंद होती याबाबत स्थानिक नगरसेविका ॲड.शिवानी घरत यांनी शासनाकडे तसेच पनवेल महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार करून सदर चौकी सुरू करण्याची मागणी केली होती.या मागणीला यश आले असून या संदर्भात नुकतेच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे तसेच इतर नगरसेविकांनी या विभागाची पाहणी करून आवश्यक असलेल्या त्रुटी लवकरात लवकर दूर करून पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून या ठिकाणी सुविधा पुरवून ही बंद असलेली पोलीस चौकी सुरू करण्याचे ठरविण्यात आल्याने नगरसेविका ॲड.शिवानी घरत यांनी आपल्या मागणीची दखल घेवून ही चौकी पुन्हा सुरू होत असल्याने त्यांनी आभार मानले आहेत.



# मातोश्री विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**जळगाव, प्रतिनिधी :** प्रबोधन संस्था जळगाव संचलित मातोश्री प्राथमिक विद्यालय, प्रबोधन नगर ,जळगाव येथे प्रबोधन संस्थेचे अध्यक्ष ॲड . जयप्रकाश बाविस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी शाळा प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुष्प, टाळयांच्या गजरात व आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी ॲड.कैलास सोनार, मुख्याध्यापक समाधान इंगळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून प्रवेशोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. प्रवेशद्वाराजवळ फीत कापून विद्यार्थ्यांचे ढोल ताशाच्या गजरात स्वागत करण्यात आले, त्यानंतर बालवाडी व पहिलीतील विद्यार्थ्यांचे कागदावर शाळेतील पहिले पाऊल असा ठसा घेण्यात आला. त्यानंतर शाळेतील



सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी औक्षण करून त्यांच्या प्रगतीसाठी प्रार्थना केली.यावेळी विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाचे महत्त्व, नियमित उपस्थिती, स्वच्छता आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.नवागत विद्यार्थ्यांना पुष्प, शैक्षणिक साहित्य,मोफत पाठ्यपुस्तके व शुभेच्छा देऊन त्यांच्या शालेय जीवनाच्या नवीन प्रवासाची सुरुवात करण्यात आली. पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले. उपशिक्षक समाधान ठाकरे यांनी सूत्रसंचालन केले. यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले."प्रत्येक बालक शाळेत, प्रत्येक बालक शिक्षणात" हा संदेश देत प्रवेशोत्सवाचा समारोप करण्यात आला.

# वीज ग्राहकांना देण्यात येणारी सेवा ही परिपूर्ण असावी : खा.श्रीरंग बारणे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल, उरण व कर्जत परिसरातील अनेक वीज ग्राहकांना गेल्या 15 दिवसांमध्ये वीज पुरवठा खंडीत होण्याच्या त्रासाला सामोरे जावे लागले आहे. यासंदर्भात वीज वितरण कंपनीने उपाययोजना केली असली तरी आगामी काळात वीज ग्राहकांना देण्यात येणारी सेवा ही परिपूर्ण असावी, असे आवाहन खा.श्रीरंग बारणे यांनी आज पनवेल महानगरपालिकेच्या सभागृहात घेतलेल्या वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या सोबत बैठकीत केले आहे. त्यानंतर त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत या संदर्भात माहिती दिली.

सदर बैठक खा.श्रीरंग बारणे यांनी आयोजित केली होती. या बैठकीला पनवेल, उरण व कर्जत येथील वीज



वितरण कंपनीचे अधिकारी त्यामध्ये प्रामुख्याने अधिक्षक अभियंता दिपक पाटील यांच्यासह इतर अधिकारी वर्ग, जिल्हाप्रमुख व नगरसेवक रामदास शेवाळे, महानगरप्रमुख व नगरसेवक ॲड.प्रथमेश सोमण, नगरसेविका सायली सरक, शहरप्रमुख तुकाराम सरक यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीची माहिती देताना खा.श्रीरंग बारणे यांनी सांगितले की, आगामी काळात विद्युत पुरवठा खंडीत होवू नये यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. त्यामध्ये सबस्टेशन, अंडरग्राऊंड उपाय योजना, डीपी, केबल बदलणे, उघड्या डिपी बंदिस्त करणे, फायबर फिडरचा वापर करणे, वीज चोरीचे प्रकार थांबविणे, स्मार्ट मीटर संदर्भात ग्राहकांना योग्य ती माहिती द्यावी, तसेच शहरी भागात 4 नवी सबस्टेशन उभारण्यात येणार आहेत.

त्याचप्रमाणे ग्रामीण भागात 3 नवीन सबस्टेशन पुढील 3 महिन्यात उभारण्यात येणार असल्याने ग्राहकांना त्याचा फायदा होणार आहे. केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या ग्राहकांसाठी विविध योजना ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याचे काम संबंधित विभागाने करणे जरुरीचे आहे. या संदर्भात त्यांना मार्गदर्शन केले आहे. आगामी पावसाळ्याच्या काळात वीज वितरणमध्ये काही त्रुटी किंवा विद्युत पुरवठा खंडीत झाला तर कुठे संपर्क साधावा या संदर्भात सर्व नागरिकांना, शासकीय यंत्रणेला याची माहिती वेळोवेळी देण्यात यावी. ग्राहक हा राजा असून त्याला वीज पुरवठा कशा तऱ्हेने सुरळीत मिळेल याकडे अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे.

कार्यालयामध्ये तुमचे अधिकारी व कर्मचारी उपलब्ध असणे गरजेचे आहे. एखादी घटना घडल्यानंतर तात्काळ त्या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी पोहचून तेथील खंडीत वीज पुरवठा सुरळीत करून देण्यात यावा, ग्रामीण भागात सुद्धा तेथील बांधवांना वीज पुरवठा कशा तऱ्हेने सुरळीत मिळेल याकडे लक्ष घालावे, यासाठी केंद्र शासनाकडून जी काही मदत लागेल ती करण्यास आम्ही तयार असल्याचे सांगितले.

# कोकण रेल्वे ऑल इंडिया एससी/एसटी रेल्वे एम्प्लॉईज असोसिएशनची (मिलिंद आवाड गट )ब्रांच मिटिंग दिनांक 14 जून रोजी उडपी येथे उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :-सचिन पवार रायगड :-**सन्माननीय केंद्रीय अध्यक्ष आयु मिलिंद आवाड साहेब, झोनल अध्यक्ष मुकेश भासणे साहेब यांच्या मार्गदर्शनाने

उडपी येथे ऑल इंडिया एससी/एसटी रेल्वे एम्प्लॉईज असोसिएशनची महत्त्वपूर्ण मिटिंग नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या मिटिंग मध्ये संघटनेच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच नवीन ब्रांच कार्यकारिणीची स्थापना करण्यात आली.बैठकीस कारवार रिजन चे अध्यक्ष श्री. मुरलीधर, श्री. संदीप नाईक,



श्री. गणेश राज तसेच रिजनचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. कोकण रेल्वेचे झोनल वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. रवींद्र नाईक यांनी संघटनेच्या बळकटीकरणासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

बैठकीचे अध्यक्षस्थान झोनल कार्याध्यक्ष श्री. बाबू थंक्कापण यांनी भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी अनुसूचित जाती-जमातीतील रेल्वे कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण, सामाजिक न्याय आणि कर्मचारी कल्याणासाठी संघटनेची भूमिका अधिक प्रभावी करण्यावर भर दिला. तसेच संघटनेच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.बैठकीदरम्यान नवीन ब्रांच कमिटी स्थापना करण्यात आली. नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. संघटना अधिक मजबूत करून कर्मचारी हितासाठी कार्य करण्याचा निर्धार नव्या कमिटीने व्यक्त केला.कार्यक्रमात उपस्थित पदाधिकारी व सदस्यांनी संघटनेच्या भविष्यातील उपक्रमांबाबत आपली मते मांडली. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या मिटिंगमुळे संघटनेच्या कार्याला नवचैतन्य मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.प्रतिनिधी ऑल इंडिया एससी/एसटी रेल्वे एम्प्लॉई असोसिएशन,(मिलिंद आवाड गट )कारवार रिजन

# वांगी खुर्दमध्ये दूषित पाण्यामुळे आरोग्य धोक्यात ; विजय म्हस्के पाटील यांचा ग्रामपंचायत प्रशासनाला इशारा

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : वांगी खुर्द (ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील ग्रामस्थांना गेल्या काही दिवसांपासून अत्यंत दूषित आणि पिवळसर पाण्याचा पुरवठा होत असल्याने आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याकडे गांभीर्याने लक्ष देऊन शुद्ध पाणीपुरवठा करण्यासह नाथवाडी परिसरातील सांडपाण्याची समस्या तातडीने मार्गी लावावी, अशी लेखी मागणी केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील यांनी ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकाऱ्यांकडे केली आहे.निवेदनात विजय म्हस्के पाटील यांनी नमूद केले आहे की, पाणी शुद्धीकरणाची कोणतीही प्रक्रिया न करता अशुद्ध पाणी पुरवल्यामुळे गावात लहान मुलांसह अनेकांना आजारपणाला तोंड द्यावे



लागत आहे. विशेषतः मुतखड्याच्या (किडनी स्टोन) रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ झाली असून, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. गावातील नाथवाडी परिसरात, शंकर बाबर यांच्या घराजवळ मोठ्या प्रमाणावर सांडपाणी साचले आहे. या साचलेल्या पाण्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी सुटली असून, तिथे डास आणि कीटकांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. यामुळे डेंग्यू आणि मलेरियासारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला असून, ये-जा करणाऱ्या नागरिकांना आणि स्थानिक रहिवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.विजय म्हस्के पाटील यांनी ग्रामपंचायत प्रशासनाला तातडीने खालील उपाययोजना करण्याचा इशारा दिला आहे: पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींची स्वच्छता करून त्यात रसायने/टीसीएल पावडर टाकून शुद्ध व स्वच्छ पाणीपुरवठा सुरू करावा आणि नाथवाडी येथील साचलेल्या पाण्याची विल्हेवाट लावून तिथे जंतुनाशक पावडरची फवारणी करावी. प्रशासनाने या गंभीर समस्यांकडे तातडीने लक्ष देऊन कार्यवाही करावी, अन्यथा ग्रामस्थांच्या आरोग्याला काही इजा झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ग्रामपंचायत प्रशासनाची राहील, असा स्पष्ट इशारा विजय म्हस्के पाटील यांनी निवेदनात दिला आहे.

# भाजप युवा नेतृत्व अमोल जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणाचा सामाजिक उपक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल | वार्ताहर :** भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा, नवीन पनवेल शहर मंडलाचे युवा, तडफदार आणि कार्यकर्त्यांमध्ये लोकप्रिय मंडलाध्यक्ष अमोल राजन जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपणाचा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. रविवार, दि. १४ जून रोजी प्रभाग क्र. १७ मधील आयप्पा मंदिराजवळील नवीन पुलाच्या दुभाजकावर हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. वाढदिवस साजरा करण्याच्या पारंपरिक पद्धतीऐवजी समाजोपयोगी उपक्रम राबवून अमोल जाधव यांनी सामाजिक जबाबदारीचे दर्शन घडविले.

यापूर्वी अमोल जाधव यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त माजी खासदार व लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद प्राप्त केले. तसेच पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेशशेठ ठाकूर यांचीही भेट घेत त्यांच्या शुभेच्छा स्वीकारल्या.



या प्रसंगी भाजपा उत्तर रायगड जिल्हा सदस्य श्याम साळवी, भाजपा अनुसूचित जाती मोर्चा नवीन पनवेल शहर मंडलाचे उपाध्यक्ष सुजित खंडिझोड, सरचिटणीस ॲड. शिवकुमार कांबळे, भाजपा दिव्यांग मोर्चाचे नवीन पनवेल अध्यक्ष प्रथमेश भंडारे, तसेच जयेश कांबळे, साईनाथ भटकळ, अनिकेत पंडीत, सतीश जामधेडे, सागर येसनकर, रोहित शिंदे, शामा कोलकर, शिरू शिंदे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. वाढदिवसाचे औचित्य साधून राबविण्यात आलेल्या या वृक्षारोपण उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडूनही कौतुक करण्यात आले.

# सोयगाव केंद्रीय प्राथमिक शाळेत भव्य शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, सोयगाव येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी आयोजित करण्यात आलेला भव्य शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. विद्यार्थ्यांचे स्वागत, प्रवेशोत्सव रॅली,शैक्षणिक साहित्य वितरण, पालक मार्गदर्शन तसेच वृक्षारोपण अशा विविध उपक्रमांनी कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली.

कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्या मा. पुष्पाताई काळे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी मा.डॉ. सारिका दशरथ लाडगे,पंचायत समिती सभापती मा.उत्तम राठोड, पंचायत समिती सदस्य मा.राहुलभाऊ राठोड,गटविकास अधिकारी मा.अमोल जगताप, गटशिक्षणाधिकारी मा.सचिन



शिंदे,केंद्रप्रमुख मा.फिरोज तडवी,माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष मा. रविंद्रभाऊ काळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.भागवत गायकवाड तसेच सदस्य राजेंद्र दुतोंडे,रविंद्र साखळे व अण्णा वाघ उपस्थित होते.तसेच पोलीस हेड कॉन्स्टेबल मा.जिरी साहेब,मा. सोनवणे साहेब,आगार प्रमुख मनीष भगवानराव जवळेकर,अण्णासाहेब ढेपले,संतोष पाखरे आणि मधुकर आमटे यांनीही कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमात नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले.शाळा प्रवेशोत्सव रॅलीद्वारे शिक्षणाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविण्यात आले.विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले तसेच पालक मार्गदर्शन व संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहितीही यावेळी देण्यात आली. यावेळी मा.पुष्पाताई काळे यांच्या हस्ते दोन वृक्षांची लागवड करण्यात आली. त्यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही देत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमादरम्यान सर्व मान्यवरांनी शाळा परिसर, वर्गखोल्या, शैक्षणिक सुविधा तसेच विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रमांची पाहणी केली. विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या कलागुणांचे, गुणवत्तेचे आणि आत्मविश्वासाचे कौतुक केले.शाळेतील स्वच्छता, शिस्त आणि सकारात्मक शैक्षणिक वातावरणाबद्दल समाधान व्यक्त करत शाळेच्या प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचेही गौरवोद्गार काढले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, सुरेखा चौधरी,महाकाळ मॅडम,प्रतिभा कोळी,सविता पाटील,गणेश बाविस्कर, अकुश काळे,मंगला बोरसे,मंदा म्हस्के, पांडुरंग बारगजे,पूनम कल्याणकर,शुभम देसले,शेख विकार आणि बागवान सर यांनी विशेष परिश्रम घेतले.मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक,सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली असून विद्यार्थीकेंद्रित उपक्रम, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या कार्याचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले.मुख्याध्यापक,शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ,पालक आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्यामुळे हा शाळा प्रवेशोत्सव यशस्वी ठरल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# पालक प्रवास उपक्रमांतर्गत घाटकोपर विधानसभा क्षेत्रातील समस्यांवर पालकमंत्री आशिष शेलार यांची बैठक ;विकास कामांना गती देण्याचे निर्देश

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर (केतन भोज):**कॅबिनेट मंत्री तथा मुंबई उपनगराचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार आणि महापौर रितू तावडे यांनी घाटकोपर विधानसभा क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांसोबत पालक प्रवास उपक्रमांतर्गत महत्त्वपूर्ण बैठक घेत विविध स्थानिक समस्या जाणून घेतल्या.यावेळी नागरिकांच्या सोयीसुविधा व प्रलंबित विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.या बैठकीदरम्यान पार्कसाईट वॉर्ड क्र.१२३/१२४ मधील विविध विकास कामांसंदर्भातील



निवेदन भाजपा पार्कसाईट मंडळ अध्यक्ष संतोष गांजले यांनी सादर केले.यामध्ये रस्ते दुरुस्ती,जलनिस्सारण व्यवस्था,स्वच्छता,सार्वजनिक सुविधा तसेच इतर नागरी समस्यांचा समावेश होता. निवेदनातील मुद्द्यांवर सखोल चर्चा करून पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

तसेच विभागातील विकासकामांना गती देऊन नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यात येतील,अशी ग्वाही यावेळी देण्यात आली.

या बैठकीमुळे पार्कसाईट विभागातील प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार असून स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# दिव्यांगांच्या रेल्वे प्रवासातील समस्यांबाबत पत्रकार उत्कर्ष समितीचे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**डोंबिवली प्रतिनिधी- गुरुनाथ तिरपणकर** : दिव्यांग प्रवाशांना रेल्वे प्रवासादरम्यान भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत पत्रकार उत्कर्ष समितीने पुढाकार घेत डोंबिवली रेल्वे सुरक्षा बल आणि रेल्वे पोलीस विभागाकडे निवेदन सादर केले. समितीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे व प्रदेश संघटक गुरुनाथ तिरपणकर यांनी दिव्यांग बांधवांसह संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्या अडचणी मांडल्या.पत्रकार उत्कर्ष समिती ही पत्रकारांच्या हितासाठी कार्य करत असतानाच सामाजिक बांधिलकी जपत समाजातील सर्व स्तरांतील घटकांच्या प्रश्नांसाठीही सातत्याने प्रयत्नशील आहे. मध्य रेल्वेच्या स्थानिक गाड्यांमध्ये दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या डब्यांमध्ये अनेक सक्षम नागरिक प्रवास करत असल्याने दिव्यांग प्रवाशांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली होती.दिव्यांग बांधव सचिन गरुड, पुष्कर चिंवडकर आणि गुलाब आव्हाड यांनी रेल्वे प्रवासात येणाऱ्या समस्यांबाबत डॉ. अशोक म्हात्रे यांच्याकडे तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेत डॉ. म्हात्रे यांनी मागील आठवड्यात मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे




याबाबत पाठपुरावा केला होता. याच अनुषंगाने आज डोंबिवली येथील रेल्वे सुरक्षा बल व रेल्वे पोलीस विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेण्यात आली. दिव्यांग प्रवाशांना राखीव डब्यांमध्ये प्रवास करताना भेडसावणाऱ्या अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी रेल्वे पोलीस अधिकारी श्री. पाल व श्री. तुळे यांनी दिव्यांगांसाठी राखीव डब्यात अनधिकृतपणे प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कठोर कारवाई करण्यात येईल, तसेच अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्यात येतील, असे आश्वासन दिले. दिव्यांग प्रवाशांच्या हक्कांसाठी पत्रकार उत्कर्ष समितीने घेतलेल्या या पुढाकाराचे दिव्यांग बांधवांनी स्वागत केले असून, रेल्वे प्रशासनाने याबाबत प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# दीर्घ संघर्षातून यश प्राप्त करणे ही आपली संस्कृती आहे; मात्र दररोज पसरवल्या जाणाऱ्या असत्याशी लढण्यासाठी प्रशिक्षण वेळेची गरज आहे "-आशिष शेलार

## भाजपच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय नगरसेवक प्रशिक्षण वर्गास आज पासून प्रारंभ

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपुर :** भारतीय जनता पार्टीच्या "पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान – २०२६" अंतर्गत नागपूर महानगर नगरसेवक प्रशिक्षण वर्गाला आज रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, भाईंदर येथे उत्साहात प्रारंभ झाला.१५ व १६ जून ला पार पडणाऱ्या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन सत्राला महाराष्ट्र राज्याचे मंत्री मा. ॲड. आशिष शेलार, रेखा ताई महाजन,आमदार संजय उपाध्याय,भाजप नागपूर महानगर अध्यक्ष मा.दयाशंकर तिवारी,नागपूर उपमहापौर लीला ताई हातीबेड,माजी आमदार अनिलजी सोले तसेच नागपूर मनपा सत्तापक्ष नेता नरेंद्र बोरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.दीपप्रज्वलन करून भारत माता,दीनदयाल जी उपाध्याय,श्यामा प्रसाद जी मुखर्जी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. प्रशिक्षण वर्गाचे प्रस्ताविक मनपा सत्तापक्ष नेता बाल्या बोरकर यांनी केले.नेतृत्व, विकास व संवाद कौशल्य या प्रथम सत्राच्या विषयावर मा. ॲड. आशिष शेलार मार्गदर्शन करताना म्हणाले की,"दीर्घ संघर्षातून यश प्राप्त करणे ही भारतीय जनता पक्षाची संस्कृती आहे; मात्र दररोज पसरवल्या जाणाऱ्या असत्याशी लढण्यासाठी प्रशिक्षण अत्यावश्यक आहे." भारतीय जनता पक्षाचा इतिहास हा सातत्यपूर्ण संघर्षाचा इतिहास आहे. प्रभू श्रीरामांच्या जन्मभूमीवरील भव्य मंदिर उभारणीसाठी झालेले रामजन्मभूमी आंदोलन, जम्मू-काश्मीरमधून कलम 370 हटविण्यासाठीची दीर्घ लढा,



गोवा मुक्तीसाठीचा संघर्ष तसेच पश्चिम बंगालमध्ये पक्ष विस्तारासाठी कार्यकर्त्यांनी केलेले अथक परिश्रम व बलिदान या मागे अनेक वर्षांची तपश्चर्या आणि समर्पण दडलेले आहे. या संघर्षांच्या बळावरच भारतीय जनता पक्षाने जनतेचा विश्वास संपादन करून देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून स्थान मिळविले आहे, असे त्यांनी सांगितले. पण दररोज विरोधकांकडून पसरविण्यात येणाऱ्या खोट्या बातम्यांपासून जनतेला जागृत करण्यासाठी प्रशिक्षण अत्यन्त आवश्यक आहे,दोन दिवसीय या प्रशिक्षण वर्गामध्ये विविध विषयांवर मान्यवर वक्त्यांचे मार्गदर्शन होणार आहे."सोशल मीडिया व AI चा प्रभावी उपयोग" या विषयावर मा. कौस्तुभ फलटनकर, "केंद्र व राज्य सरकारच्या योजना" या विषयावर मा. आमदार योगेश सागर तसेच "प्रशासन व नगरसेवक समन्वय" या विषयावर मा. दयाशंकर तिवारी मार्गदर्शन करणार आहेत. प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी "नागरिकांशी संवाद व प्रभागातील विकासकामे" या विषयावर प्रा. अनिल सोले, "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व नगरसेवकांची भूमिका" या विषयावर पूर्व मुख्य सचिव प्रवीण परदेशी, "शहर व्यवस्थापनात नगरसेवकांची भूमिका" या विषयावर केंद्रीय मंत्री मुरलीधरराव मोहोळ, "संघटन मूळ विचार, दृष्टिकोन, इतिहास व विकास" या विषयावर मा. विनय जी सहस्त्रबुद्धे, "अर्थसंकल्पाचा अभ्यास व वित्तीय नियोजन" या विषयावर पूर्व वित्त मंत्री सुधीर मुनगंटीवार तसेच "समन्वय (कार्यकर्ता, विचारपरिवार व अन्य सामाजिक संघटना)" या विषयावर राष्ट्रीय सह संगठन मंत्री मा. शिवप्रकाशजी मार्गदर्शन करणार आहेत.प्रशिक्षण वर्गाच्या समारोप सत्रात "संघटन विस्तार" या विषयावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस मार्गदर्शन करणार असून, या प्रशिक्षणाच्या माध्यमातून नगरसेवकांना प्रभावी लोकप्रतिनिधित्वासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्य आणि दृष्टीकोन प्राप्त होणार आहे.विशेष म्हणजे, या निवासी प्रशिक्षण वर्गामध्ये भारतीय जनता पार्टी व शिवसेना नागपूर महानगरचे सर्व नगरसेवक दोन दिवस पूर्णवेळ उपस्थित राहणार असून, लोकप्रतिनिधी म्हणून त्यांचे ज्ञान, कौशल्य आणि कार्यक्षमता अधिक वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन दिले जाणार आहे.

निवासी आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षणामुळे नगरसेवकांना अभ्यास, चर्चा आणि अनुभवांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळणार आहे.उदघाटन सत्राचे संचालन भाजपा महानगर महामंत्री सौ मनीषा ताई धावडे यांनी केले तर आभार महानगर महामंत्री संदीप जाधव यांनी व्यक्त केले.

## थोड क्यात

### मुलाने बापाला गेली मारहाण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** राहते घर स्वतःच्या नावे करून देत नसल्याने मुलाने त्याच्या दोन मित्रांसह बापाला मारहाण केल्याची घटना भाताण पाडा येथे घडली. या प्रकरणी 13 जून रोजी मुलगा भरत बाळकृष्ण मुकादम आणि त्याच्यासोबत असलेले दोन मित्र परशुराम घरत आणि भैय्या यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी बाळकृष्ण मुकादम त्यांचा मुलगा भरत मुकादम त्याच्या नावावर राहते घर करून देत नाही याचा राग मनात धरून 12 जून रोजी रात्री साडे अकराच्या सुमारास भरत मुकादम आणि त्याचे दोन मित्र परशुराम घरत आणि भैय्या यांनी बाळकृष्ण मुकादम यांना शिवीगाळ केली आणि हाताबुक्याने मारहाण केली यावेळी फिर्यादी यांची पत्नी सोडवण्यात आली असता तिला देखील भरत याने हाताबुक्याने मारहाण केली आणि लाथ मारून घराच्या पायरीवरून खाली ढकलली. यात त्या जखमी झाल्या.

### घरफोडीत तीन लाख तीस हजारांचे दागिने केले लंपास

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : नवीन पनवेल येथील घरात प्रवेश करून चोरांनी तीन लाख तीस हजार रुपयांचे दागिन्यांची चोरी केली. या प्रकरनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात 12 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. अजय काथे हे सेक्टर एक नवीन पनवेल येथे राहत असून ते त्यांच्या घरात कुटुंबासह झोपलेले असताना चोरांनी त्यांच्या घराच्या मागील बाजूला असलेल्या लोखंडी गेटला असणारे कुलूप तोडले आणि तळमजल्याला असलेली लाकडी खिडकीची कडी कडून घरात प्रवेश केला आणि तिसऱ्या मजल्यावरून बेडरूम मध्ये असलेल्या लोखंडी कपाटातील दागिने चोरून नेले.

### ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** आदिवासी महिलेला शिवीगाळ आणि दमदाटी केल्याप्रकरणी सीमा संतोष भोईर (राहणार नितळस) यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटी अंतर्गत ११ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पीडित आदिवासी महिला मजुरीच्या कामावर जात असताना नितळस गावाकडे जाणाऱ्या रोडवर आरोपीने तिला पाहून शिवीगाळ आणि दमदाटी केली.

## सिंगोना जिल्हा परिषद शाळेत पहिल्या दिवशी नवागतांचे पुष्पहाराने जंगी स्वागत

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके)** : सोमवार, 15 जून 2026 शैक्षणिक वर्ष 2026-2027 च्या पहिल्याच दिवशी सिंगोना जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. नव्याने प्रवेश घेतलेल्या सर्व मुला-मुलींचा पुष्पहार घालून गौरव करण्यात आला. शाळेच्या वतीने यावेळी सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटपही करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कैलासभाऊ सोळंके तर प्रमुख पाहुणे म्हणून कांता भाग्यवंत उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक सत्रासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या व नियमित शाळेत येण्याचे आवाहन केले.



कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका श्रीमती सुचिता कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली गायकवाड सर, विकास वेडेकर सर व श्रीमती सोईतकर मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. पहिल्याच दिवशी मिळालेल्या या आपुलकीच्या स्वागताने नवागत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

शाळा प्रवेशोत्सवामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## सावळदबारा येथील शिक्षण महर्षी कै .नानासाहेब कोलते यांच्या स्मरणार्थ गणवेश वाटप कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** सोयगाव तालुक्यातील सावळद बारा येथील जय कालिंका देवी शिक्षण प्रसारक संस्था, सावळद बारा येथील संस्थापक अध्यक्ष तथा शिक्षणमहर्षी कै. लक्ष्मणराव (नानासाहेब) कोलते यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी संस्थाध्यक्ष भाऊराव कोलते यांनी नानासाहेब कोलते यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.पुण्यतिथीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश,पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.नवीन प्रवेशित तसेच शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना या साहित्याचा लाभ देण्यात आला.यावेळी संस्था प्रशासकीय अधिकारी नारायण कोलते यांनी नानासाहेब कोलते यांच्या जीवनकार्यावर



प्रकाश टाकला. डोंगराळ व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी १९७८ मध्ये संस्थेची स्थापना केली. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आज संस्थेच्या तीन शाखांमधून केजी ते पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जात असून सुमारे पाच हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कार्यक्रमास संस्थेचे संचालक मंडळ,मुख्याध्यापक,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पी.एम.श्री शाळा मुळेखंड शाळेमध्ये शाळा प्रवेशोत्सव पहिले पाऊल उत्साहात साजरा!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : आज सोमवार १५जून २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होत असताना उरण तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सागर पवार सर यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एम. श्री रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुळेखंड या शाळेमध्ये नाविन्यपूर्ण रीतीने मोठ्या आनंदाने हा उपक्रम साजरा करण्यात आला. गावामध्ये जनजागृती करून नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी सुंदर अशी सजावट तयार करण्यात आली होती नवागत विद्यार्थी व या कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचे गुलाब पुष्पवृष्टी करून लेझीम व बँड च्या वाद्यावर स्वागत करण्यात आले. तद् नंतर नवागत विद्यार्थ्यांचे पायाचे ठसे घेऊन त्यांना मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प व कॅडबरी तसेच पहिले पाऊल आनंदाने स्वीकारले गेले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी सर्जेराव पाटील सर गटविकास अधिकारी पंचायत समिती उरण, यांच्या शुभहस्ते फीत कापण्यात आली. उपस्थित



सर्व मान्यवरांच्या हस्ते गणपती सरस्वती व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले दीप प्रजनन करून पाटील सर यांनी श्रीफळ वाढवून या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. तर नंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ शाल देऊन स्वागत करण्यात आले. सर्व नवागता विद्यार्थ्यांसह सर्वांना मोफत पाठ्यपुस्तक व मोफत गणवेश यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषद सदस्या रीनाताई घरत मॅडम, उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील सर,ग्रुप ग्रामपंचायत चाणजेचे आदर्श सरपंच अजय म्हात्रे, सदस्या पुष्पाताई म्हात्रे, माजी सरपंच श्री. जितेंद्र घरत, नवीन शेवे केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर म्हात्रे ग्राम विकास अधिकारी सुधीर चव्हाण,गाव अध्यक्ष प्रीतम पाटील, गाव उपाध्यक्ष तथा समाजसेवक जगदीश म्हात्रे, ज्येष्ठ नागरिक मंडळ अध्यक्ष ,प्रकाश म्हात्रे कार्याध्यक्ष अनंत पाटील सदस्य सुभाष गुरव, योग टीचर केशव म्हात्रे, ह.भ.प.श्री. भालचंद्र म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनीषा म्हात्रे, शिक्षण प्रेमी नागरिक सदस्य.सौ अनुताई पाटील,सदस्य महेश म्हात्रे, अनिता सावळे, मार्गदर्शिका श्रीमती जयवंती आई ठाकूर, मुख्याध्यापिका विद्या वाणी मॅडम, शिक्षक वृंद अंगणवाडीताई वंदना पाटील सविता पाटील पालक व विद्यार्थी प्रमुख उपस्थिती लाभली. या कार्यक्रमात बोलताना मान. सर्जेराव पाटील साहेब यांनी शाळेच्या परिसराबाबत व कार्यक्रमाबाबत कौतुक करून नवागत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. ग्रामस्थ करत असलेले सहकार्य पाहता ग्रामस्थांनी देखील आपल्या मराठी शाळेमध्ये आपली मुले निश्चितपणाने दाखल करावीत. असे आवाहन देखील केले. माननीय अजय म्हात्रे आदर्श सरपंच याने देखील शाळेने केलेला कायापालट व शिक्षकांनी घेतलेली मेहनत हे नक्कीच वाखण्याजोगे असून आमच्या शाळेला उत्तम शिक्षक लाभलेले आहेत. परंतु अधिक दोन शिक्षकांची गरज आहे. त्याचा देखील प्रशासनाने विचार करावा अशी देखील मागणी केली. माननीय रीना ताई घरत यांनी देखील सर्व विद्यार्थी पालक व शिक्षकांना या वर्षाच्या शुभेच्छा देत जिल्हा परिषदेत अंतर्गत असणारे शाळेसाठी कोणतीही कामे करण्यात आम्ही कटिबद्ध आहोत असे आश्वासन दिले.उपक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्षा मनीषा म्हात्रे, मुख्याध्यापिका विद्या वाणी, सहशिक्षिका दिशा तांडेल मॅडम,संजय होळकर सर, विषय शिक्षक नारायण गोवारी सर, समाजशिक्षिका पूजा म्हात्रे मॅडम, अस्मिताताई म्हात्रे व अन्य सहकारी यांनी विशेष मेहनत घेतली. या कार्यक्रमाला ग्रुप ग्रामपंचायत चानजे यांनी विशेष सहकार्य केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन सूत्रसंचालन व आभार शाळेचे उपक्रमशिल संजय होळकर सर यांनी केले.


## पालोद येथे वन्यप्राण्यांकडून मिरची पिकाची नासधूस; शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील पालोद शिवारातील गट नंबर २०७ येथील शेतकऱ्याच्या मिरची पिकाचे वन्यप्राण्यांनी अतोनात नुकसान केले आहे. वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे पिकाचे झालेले नुकसान पाहून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून, वनविभागाकडे नुकसान भरपाईसाठी धाव घेतली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पालोद येथील शेतकरी शेख शफिक शेख हनिफ यांनी आपल्या शेतात अर्धा एकर क्षेत्रावर मिरचीची लागवड केली होती. मात्र, काही दिवसांपासून परिसरात वन्यप्राण्यांचा वावर वाढल्याने या प्राण्यांनी उभ्या मिरची पिकाची नासधूस केली आहे. यामुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

या नुकसानीची दखल घेत शेतकरी शेख शफिक यांनी वनविभागाकडे



ऑनलाइन तक्रार नोंदवली आहे. वनविभागाच्या संबंधित पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी करावी आणि कायदेशीर पंचनामा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्याला त्वरित नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी शेख शफिक यांनी केली आहे. परिसरात वाढत्या वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे इतर शेतकरीही चिंतेत असून, वनविभागाने यावर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या नूतन कार्यकारी संचालक मंडळाची घोषणा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** मराठी चित्रपटसृष्टीच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या 2026-27 ते 2031-32 या सहा वर्षांच्या कालावधीसाठीच्या नूतन कार्यकारी संचालक मंडळाची घोषणा करण्यात आली आहे. मराठी चित्रपट, नाट्य, दूरचित्रवाणी आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनुभवी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा या मंडळात समावेश करण्यात आला असून, आगामी काळात मराठी चित्रपटसृष्टीच्या प्रगतीसाठी हे मंडळ महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे.



नूतन कार्यकारी संचालक मंडळाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ चित्रपट व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्ते मेघराज राजेभोसले यांची निवड करण्यात आली आहे. तर उपाध्यक्षपदी धनाजी यमकर (कोल्हापूर) आणि सुप्रसिद्ध गायक-अभिनेते आनंद शिंदे (मुंबई) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महामंडळाच्या दैनंदिन कामकाजाची जबाबदारी सांभाळण्यासाठी सुशांत शेलार यांची प्रमुख कार्यवाह म्हणून निवड करण्यात आली आहे. सुनील महाजन यांच्याकडे खजिनदारपदाची धुरा सोपविण्यात आली असून, दीपक कदम आणि प्रवीण पाटील ऊर्फ वासू पाटील यांची सहकार्यवाह म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच शरद चव्हाण यांची सहखजिनदारपदी निवड करण्यात आली आहे.

कार्यकारी संचालक मंडळामध्ये विविध क्षेत्रांतील अनुभवी व्यक्तींना संधी देण्यात आली आहे. यामध्ये विजय खोचीकर, चैत्राली डोंगरे, रवींद्र गावडे, सुभाष नकाशे, राज काझी, वर्षा उसगावकर, अजित शिरोळे, गणेश गारगोटे आणि विकास तोरणे यांचा संचालक म्हणून समावेश करण्यात आला आहे.

मराठी चित्रपटसृष्टीसमोरील विविध आव्हानांचा सामना करताना कलाकार, निर्माते, दिग्दर्शक, लेखक, तंत्रज्ञ आणि चित्रपट क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी हे नवीन मंडळ प्रयत्नशील राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. चित्रपट निर्मितीला चालना देणे, नवोदित कलाकारांना संधी उपलब्ध करून देणे, तंत्रज्ञांच्या समस्या सोडविणे तसेच मराठी चित्रपटांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक व्यापक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी महामंडळाची भूमिका अधिक बळकट करण्याचा संकल्प या नव्या मंडळाने व्यक्त केला आहे.

नवीन कार्यकारी संचालक मंडळाच्या निवडीचे वृत्त समोर आल्यानंतर मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकार, निर्माते, दिग्दर्शक, तंत्रज्ञ आणि विविध सांस्कृतिक संस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेक मान्यवरांनी नव्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत मराठी चित्रपटसृष्टीच्या विकासासाठी त्यांच्या कार्यकाळात सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतले जातील, असा विश्वास व्यक्त केला आहे.

मराठी चित्रपटसृष्टीच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि उद्योगाशी निगडित सर्व घटकांच्या कल्याणासाठी हे नूतन कार्यकारी संचालक मंडळ प्रभावीपणे कार्य करेल, अशी आशा व्यक्त केली जात असून, आगामी काळात महामंडळाच्या विविध उपक्रमांकडे संपूर्ण चित्रपटसृष्टीचे लक्ष लागले आहे.

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ

नूतन कार्यकारी संचालक मंडळ

2026-27 ते 2031-32

- अध्यक्ष मेघराज राजेभोसले
- उपाध्यक्ष (कोल्हापूर) धनाजी यमकर
- उपाध्यक्ष (मुंबई) आनंद शिंदे
- प्रमुख कार्यवाह सुशांत शेलार
- खजिनदार सुनील महाजन
- सहकार्यवाह दीपक कदम
- सहकार्यवाह प्रवीण पाटील ऊर्फ वासू पाटील
- सहखजिनदार शरद चव्हाण
- विजय खोचीकर, संचालक
- चैत्राली डोंगरे, संचालिका
- रवींद्र गावडे, संचालक
- सुभाष नकाशे, संचालक
- राज काझी, संचालक
- वर्षा उसगावकर, संचालिका
- अजित शिरोळे, संचालक
- गणेश गारगोटे , संचालक
- विकास तोरणे, संचालक

# "सुट्ट्या संपल्या,चला शाळेत!"

**दैनिक युवक आधार बीड आष्टी प्रतिनिधी :-मारुती सत्रे** : सुट्ट्या संपल्या,चला शाळेत,नव्या उत्साहाने जाऊ वर्गात.मित्रमैत्रिणी भेटतील पुन्हा,ज्ञानाच्या वाटेवर टाकू पाऊल नवं.पुस्तके,वह्या घेऊ सोबत,शिकू आनंदाने दिवसागणिक.खेळ,अभ्यास आणि नवी स्वप्ने,शाळेचे दिवस करतील जीवन सुंदर. शाळा सुरू,चला तयार होऊ,मेहनत करून यशस्वी बनू! आष्टी तालुक्यातील रुई नालकोल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने इयत्ता पहिलीच्या नवीन ऍडमिशन विद्यार्थ्यांचे मिरवणूक काढून व पुष्प वर्षाव करून व खाऊ वाटप करून स्वागत करण्यात





आले.तसेच शाळेच्या पहिल्या दिवसाचे औचित्य साधून प्रज्वल बाळासाहेब नालकोल अर्थ खाते व सांख्यिकीय विभाग मुंबई या ठिकाणी निवड झाली व उज्वला शरद नालकोल असिस्टंट ब्रँच पोस्ट ऑफिस तसेच श्रद्धा संतोष थोरवे असिस्टंट ब्रँच पोस्ट ऑफिस या तीन विद्यार्थ्यांचा सन्मान व सत्कारर समारंभ शाळेच्या वतीने व ग्रामपंचायत च्या वतीने करण्यात आला

यावेळी उपस्थित,सरपंच तात्यासाहेब नालकोल, उपसरपंच विष्णू मांढरे, पत्रकार मारुती सत्रे,सेवा सोसायटी चेअरमन पांडुरंग धोंडे, दादासाहेब नालकोल,शरद नालकोल,बाळू नालकोल, संतोष थोरवे, मुख्याध्यापक देविदास गांजुरे सर,मनोज कुमार यादव विशेष शिक्षक पंचायत समिती आष्टी शेख नगीना रशीद,मनोहर गांजुरे सर व सर्व उपस्थित मान्यवर व ग्रामस्थ

# जासई विद्यालयात नवीन विद्यार्थी प्रवेशोत्सव व पुस्तक वाटप कार्यक्रम दिमाखदार सोहळ्यात संपन्न झाला

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी / सागर घरत :** रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग,जासई ता.उरण जि. रायगड या विद्यालयात,सोमवार दिनांक १५/६/२०२६ रोजी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे धूमधडाक्यात स्वागत करण्यात आले . विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेचे प्रवेशद्वार फुग्यांनी सजवण्यात आले .लेझीम आणि बँड च्या तालावर त्यांच्यावर पुष्पवृष्टी करत नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत केले गेले . विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. म्हात्रे के. जी . मॅडम ,स्थानिक स्कूल कमिटी,उपमुख्याध्यापक श्री . कुटे सर , पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम , सर्व सेवकवर्ग यांनी विद्यार्थांचे औक्षण करून त्यांना गुलाबपुष्प आणि चॉकलेट दिले .या प्रवेशोत्सवानिमित्त कर्मवीर भाऊराव पाटील आणि वहिनी यांच्या प्रतिमेचे पूजन स्थानिक स्कूल कमिटीच्या हस्ते करण्यात आले .विद्यालयात नवीन विद्यार्थ्यांसोबतच त्यांना घेऊन आलेल्या पालकांचेही गुलाबपुष्प आणि चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले . या प्रसंगी शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष ,कामगार नेते श्री सुरेश पाटील साहेब यांनी कमिटीच्या वतीने विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. विद्यालयाचे ग्रंथपाल प्रमुख श्री. श्रीराम ठाकूर सर यांनी विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे वाटप केले.या कार्यक्रमासाठी सर्व स्थानिक स्कूल कमिटी सदस्य , विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. के. जी.मॅडम , उपमुख्याध्याप कुटे सर , पर्यवेक्षिका मुकादम मॅडम , सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते .







# नैना क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या हरकतींवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्या ; प्रधान सचिव लोकेश चंद्रा यांचे आदेश ; प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यास गती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना) अंतर्गत ज्या-ज्या टाऊन प्लॅनिंग (टीपी) स्कीमची घोषणा करण्यात आली आहे, त्या सर्व क्षेत्रांतील शेतकऱ्यांच्या हरकतींवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रधान सचिव लोकेश चंद्रा यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच नैना क्षेत्रातील गावांशी संबंधित प्रलंबित विषय तातडीने पूर्ण करून विकासकामांना सुरुवात करण्याबरोबरच शेतकऱ्यांना प्रॉपर्टी कार्ड, त्याचबरोबरीने गावांसाठी मंजूर करण्यात येणाऱ्या सामाजिक सुविधांचा सविस्तर आराखडा लवकरात लवकर सादर करण्याचे आदेशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.



नैना क्षेत्रातील स्थानिक नागरिक, शेतकरी आणि प्रकल्पग्रस्तांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध प्रश्नांबाबत आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या पुढाकारातून मुंबई येथे लोकेश चंद्रा यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यापूर्वी लोकप्रतिनिधी, सिडकोचे अधिकारी, सरपंच, ग्रामस्थ आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत विविध प्रश्नांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले होते. मात्र, जवळपास एक वर्ष उलटूनही या निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याने शेतकरी आणि प्रकल्पग्रस्तांमध्ये नाराजी होती. त्यामुळे या प्रश्नांच्या तातडीच्या निवारणासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यानुसार आजची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी शेतकरी आणि प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांशी संबंधित विविध मुद्दे ठामपणे मांडले. नैना क्षेत्रातील गावांशी संबंधित प्रलंबित विषय तातडीने पूर्ण करून विकासकामांना सुरुवात करण्याचे निर्देश लोकेश चंद्रा यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले. तसेच, शेतकऱ्यांना त्यांच्या मालमत्तेची प्रॉपर्टी कार्डे वितरित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच नैना क्षेत्रात येणार असून त्यांच्या हस्ते प्रॉपर्टी कार्डांचे वाटप करण्यात येणार असल्याची माहितीही लोकेश चंद्रा यांनी दिली. नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर परिसराच्या विकासाला वेग मिळाला असून, या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे सर्व प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत तसेच गावांसाठी मंजूर करण्यात येणाऱ्या सामाजिक सुविधांचा सविस्तर आराखडा लवकरात लवकर सादर करावा, असे आदेशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीतील सकारात्मक निर्णयांमुळे नैना क्षेत्रातील शेतकरी, प्रकल्पग्रस्त आणि ग्रामस्थांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांच्या सोडवणुकीला गती मिळणार असून त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# वृक्षारोपण करून केले अस्थिविसर्जन ; अग्रवाल कुटुंबीयांचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** येथील सुप्रसिद्ध व्यापारी संतोष विद्याराम अग्रवाल शेठ यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या संपूर्ण अग्रवाल कुटुंबीयांनी त्यांच्या अस्थिविसर्जन स्वतःच्या शेतामध्ये झाड लावून केले. यामागे संपूर्ण अग्रवाल कुटुंबियाची एकच भूमिका आहे की, सातत्याने वाढणारे जलप्रदूषण, पृथ्वीचा असमतोल आणि प्रचंड वाढणारे ऊन यामुळे भविष्यात येणारी पिढी धोक्यात आहे. त्यामुळे सर्वांनी झाडे लावणे गरजेचे आहे. आपल्या परिवारातील जेष्ठाच्या जाण्यामुळे जी पोकळी निर्माण झाली आहे, ती झाड मोठं झाल्यावर सावली, फळ आणि त्यांची आठवण कायम देणार आहे. हीच भावना सर्वांनी उराशी बाळगून, येणाऱ्या काळात अश्याच प्रकारे सर्वांनी पर्यावरणासाठी वृक्षारोपण करून अस्थिविसर्जन करावे, अशी भावना रोहित अग्रवाल व कुटुंबीयांनी व्यक्त केली.



याप्रसंगी रोहित संतोष अग्रवाल, नवीन अग्रवाल, सचिन अग्रवाल, निश्चय अग्रवाल, वृक्षवल्ली टीमचे डॉ. शेखर दौड, डॉ. सचिन सोळुंके, विजय वानखेडे, अभय वाघ, विशाल जाधव, डॉ. राहुल पालोदकर, अभिषेक काळे, डॉ. दिनेश साळवे, सिधार्थ साळवे, संतोष गाडेकर, सुदाम भाऊ सुडके, गोलू कटरिया, अकील भैय्या, अतिश ताठे, रामू सोन्ने हे सर्वजण उपस्थित होते.

# चोरंबा ग्रामपंचायत प्रकरण : कान्हा खानसोळे यांचे अन्नत्याग उपोषण मागे

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे** : चोरंबा ग्रामपंचायतीतील विविध प्रश्न, पारदर्शकता व माहितीच्या अधिकाराच्या मागण्यांसाठी पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते **कान्हा खानसोळे यांनी सुरू केलेले अन्नत्याग उपोषण अखेर मागे घेण्यात आले.




ग्राम विकास अधिकारी मुंगल साहेब यांच्या हस्ते उपोषण सोडण्यात आले. यावेळी ग्रामसेवकांनी ग्रामपंचायतीचे सर्व व्यवहार व संबंधित कागदपत्रे जनतेसमोर पारदर्शकपणे सादर करण्यात येतील, तसेच माहितीच्या अधिकारांतर्गत करण्यात आलेला अर्ज स्वीकारून त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

प्रशासनाकडून सकारात्मक भूमिका घेण्यात आल्याने आणि मागण्यांबाबत योग्य तो प्रतिसाद मिळाल्याने कान्हा खानसोळे यांनी आपले अन्नत्याग उपोषण मागे घेतल्याची माहिती दिली. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी प्रशासनाने दिलेली आश्वासने वेळेत पूर्ण करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

कान्हा खानसोळे यांनी सांगितले की, "माझा लढा कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून ग्रामपंचायतीत पारदर्शकता, जनतेला माहिती मिळणे आणि गावाच्या विकासासाठी आहे. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही तर पुढील लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल."या घटनेमुळे चोरंबा ग्रामपंचायतीतील कारभार अधिक पारदर्शक होण्याची अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

# जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मुल्हेर येथे शाळा प्रवेशोत्सव व आनंदोत्सव साजरा

**दैनिक युवक आधार**

**बागलाण तालुका प्रतिनिधी दीपक गायकवाड :** शैक्षणिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या दिवशी डांग सेवा मंडळ नाशिक संचलित जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मुल्हेर येथे शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी बैलगाड्यातून नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांची संपूर्ण गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. यानंतर विद्यालयात प्रवेशद्वारावर सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण करून गुलाब पुष्प देण्यात आले. त्यानंतर पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री धात्रक एस. सी. हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून सरपंच श्री निंबाजी भानसे, ग्रामपंचायत सदस्य श्री बन्सीलाल बत्तीसे, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष श्री हरिदास बत्तीसे, पालक शिक्षक संघ उपाध्यक्ष श्री शरदजी गांगुर्डे, माजी उपसरपंच श्री रामचंद्र खरे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य श्री उमेश नाना दीक्षित, डांग सेवा मंडळाचे संचालक श्री अनिल पंडित भाऊसाहेब, पर्यवेक्षक श्री शेख पी.आय. हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी पाचवी ते आठवीच्या प्रत्येक वर्गातील पाच विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात पुस्तकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. आलेल्या सर्व मान्यवरांचा गुलाब पुष्प व शाल देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी श्री शरदजी गांगुर्डे यांनी विद्यार्थ्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. प्राचार्य श्री धात्रक सर यांनी आपल्या अध्यक्ष मनोगतातून विद्यार्थी उपस्थिती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना यांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री येवला सी.जी. यांनी केले.

शाळेच्या पहिल्या दिवशी संपूर्ण परिसरात रांगोळी काढून, फुगे व तोरण लावून सजावट करण्यात आली होती. त्यामुळे शालेय परिसरात आनंददायी व उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले.

# उमरखेड पं. स. शिक्षण विभागात माहिती अधीकाराला केराची टोपली षडयंत्रकारी गटशिक्षणाधिकारी विजय बेतेवाड भ्रष्टाचारी मुख्याध्यापकांचे

**दैनिक युवक आधार**

**मोहदरी तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड** : उमरखेड शिक्षण विभागात माहिती अधीकाराची गटशिक्षणाधिकारी विजय बेतेवाड यांच्या मार्गदर्शनात राजरोसपणे पायमल्ली चालू आहे. तालुक्यातील दिंडाळा शाळेत माहिती अधिकार कायद्याच्या संदर्भात कुठलाही फलक लावलेला नाही. शाळेसंदर्भात माहीती तालुक्याला विचारली असता सदरील मुख्याध्यापकासोबत (अतीआपूलकिचे) संबध असलेले गटशिक्षणाधिकारी म्हणतात कि अगोदर जनमाहीती अधीकार्याला माहीती विचारा. पत्रकाराला स्वप्न पडणार आहे का कि कोणत्या शाळेवर जनमाहीती अधीकारी कोण आहे ते. माहीती अधिकार कायद्यान्वये तालुका शिक्षण विभागाने संबधीत जनमाहीती अधीकार्याकडे अर्ज हस्तांतर करणे आवश्यक असतांना. गटशिक्षणाधिकारी तो अर्ज राजरोसपणे फेटाळून लावतात. यांच्या सूनावनित व यांच्या अभयामुळे उपलब्ध असलेली माहितीसुध्दा मुख्याध्यापक स्वतःचा भ्रष्टाचार झाकण्यासाठी माहिती उपलब्ध नाही म्हणून देतात. असा प्रत्यय दिला. 05/06/2026 रोजी झालेल्या सुनावणीत एका शिक्षकाला आला. एव्हढा माज दिड दिवसात आलेल्या प्रभारी गटशिक्षणाधिकार्याला कोणामुळे आला? जिल्हा प्रशासन याकडे लक्ष देईल काय? अशी विचारणा जनमानसातून होत आहे.

उमरखेड गटशिक्षणाधिकारी प्री डिसायडेड चौकशा करण्यात माहीर : तालुक्यातील कोणत्याही शाळेची तक्रार त्याच्याकडे केली असता. सत्य असत्याची बाजु न पहाता संबधीत शिक्षकासोबत (अर्थपुर्ण?) बातचीत करून कोणाला शिक्षा द्यायची व कोणाला निर्दोष सोडायचे यासंबंधी अगोदर चर्चा करुन मगच त्याची चौकशी टिम संबधीत शाळेत रवाना होते. त्यात चाटूगिरी करणारे अनेक केंद्रप्रमुख सुद्धा सहभागी आहेत. जे केंद्रप्रमुख व शिक्षक त्यांच्या या कामांना नकार देतात त्यांना गटशिक्षणाधिकारी टार्गेट करतात. असा अनुभव जनतेला हाताला, दिंडाळा, मोरचंडी प्रकरणात आलेला आहे. अशी शिक्षक वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

**कायद्यातून पळवाटा काढण्यात व वरिष्ठांची दिशाभूल करण्यात उमरखेड गटशिक्षणाधिकारी एक्सपर्ट :**

(अर्थपुर्ण?) संगणमत झालेल्या दोषी शिक्षक, मुख्याध्यापक यांना वाचवण्यासाठी वाट्टेल त्या मार्गाने वरीष्ठांना खरी माहिती पोहचू न देता कायद्यातून पळवाट काढण्यात उमरखेड गटशिक्षणाधिकारी एक्सपर्ट आहेत. दिंडाळा शाळेत मुख्याध्यापकाने लाखोंची शालेय साहित्याची विक्री केलेली असतांना व इतर शिक्षकांनी तक्रारकर्त्या शिक्षकांना शाळेत येण्यास मज्जाव केलेला असतांना सुध्दा त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल न करता तक्रारकर्त्या शिक्षकांना कशी शिक्षा होईल. याची पुरेपुर खबरदारी गटशिक्षणाधिकारी यांनी घेतलेली आहे.

**काउंटर तक्रारी करण्यासंदर्भात शिक्षकांना मार्गदर्शन : प्रभारी**

गटशिक्षणाधिकारी विजय बेतेवाड हे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाकडे लक्ष देण्याऐवजी कोणत्या शिक्षकाची तक्रार आपणाकडे कशी येईल व त्यासंदर्भाने आपणास नोकरीआडून आपला व्यवसाय कसा करता येईल. याचा जास्त अभ्यास करतात. याचा प्रत्यय दींडाळा व हाताला प्रकरणावरून लोकांना आलेला आहे. दींडाळा प्रकरणात स्वतःची चुक झाकण्यासाठी धाब्यावर (हॉटेल वर) बसून रातोरात तक्रार करणाऱ्याच दोन शिक्षकांना वरीष्ठांची दिशाभूल करून निलंबित केलेले आहे. हातला प्रकरणात जातिवादी मुख्याध्यापकाला वाचवण्या साठि जिवाचे रान करणे चालू आहे.

विजय बेतेवाड महागावमध्ये वादग्रस्त विस्तार अधिकारी:उमरखेड मध्ये अनेक सेवाज्येष्ठ, गटशिक्षणाधिकारी पदासाठी पात्र असलेल्या लोकांना केवळ धुर्तपणाने व आपल्या भ्रष्टाचारी कोशल्याने डावळून उमरखेड गटशिक्षणाधिकारी पदाचा प्रभार घेतलेला आहे. व उमरखेडच्या संपूर्ण शिक्षणाची वाट लावलेली आहे. महागावमध्ये विस्तार अधिकारी म्हणून असतांना सुध्दा यांनी अनेक भ्रष्टाचार केल्याचे उघड झालेले होते. असा बोगस, भ्रष्टाचारी, षडयंत्रकारी, बिनडोक गटशिक्षणाधिकारी पहिल्यांदाच उमरखेड ला मिळालेला आहे. आत्ता याला उमरखेड मधून लाथा घालून हाकलून देण्याची वेळ आलेली आहे. अशी चौका चौकात चर्चा चालू आहे.

## उन्हाळी सुट्टीनंतर श्रीवर्धन तालुक्यात शाळांची घंटा वाजली; विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित** : उन्हाळी सुट्टीनंतर आजपासून श्रीवर्धन तालुक्यातील मराठी व इंग्रजी माध्यमाच्या सर्व शाळा विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने पुन्हा गजबजल्या. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी तालुक्यातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले.

शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि संस्मरणीय ठरावा, यासाठी अनेक शाळांमध्ये स्वागत उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे फुलांनी, शुभेच्छांनी आणि आनंददायी उपक्रमांच्या माध्यमातून स्वागत केले. दीर्घ उन्हाळी सुट्टीनंतर शाळेत परतलेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह आणि आनंद दिसून येत होता.



महाराष्ट्र शासन आणि रायगड जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच मोफत पाठ्यपुस्तके, वह्या आणि गणवेश उपलब्ध करून देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य वेळेवर मिळाले असून, पालकांवरील आर्थिक भार कमी होण्यास मदत झाली आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील विविध शाळांमध्ये या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली. नगरपालिका हद्दीतील शाळांमध्येही विद्यार्थ्यांचे विशेष स्वागत करण्यात आले. मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढावी, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पोषक वातावरण मिळावे आणि शाळांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे, यासाठी राबविण्यात येत असलेले हे प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहेत.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत अभ्यास, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. पहिल्याच दिवशी झालेल्या स्वागत उत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आपुलकी निर्माण झाली असून, शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंददायी वातावरणात झाली.

शासनाच्या सुविधा, शिक्षकांचे नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी राबविलेले उपक्रम यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील शाळांमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहात झाली आहे.

## कार्यकर्त्यांच्या एकजुटीतून संघटन विस्ताराचा संकल्प; तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे

**दैनिक युवक आधार**

**मंठा - नामदेव मंडपे** : येथे शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीसंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. आगामी काळात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच गावपातळीपर्यंत शिवसेनेचे कार्य प्रभावीपणे पोहोचविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे, उद्योग सेना जिल्हाकार्याध्यक्ष प्रल्हादरावजी बोराडे, तालुकाप्रमुख उदयदादा बोराडे, उपजिल्हाप्रमुख किसनरावजी मोरे, माजी सभापती संतोषराव वरकड यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत संघटन विस्तार, नव्या कार्यकर्त्यांची जोडणी, आगामी कार्यक्रमांचे नियोजन आणि जनसामान्यांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार करण्यात



आला.यावेळी तुळशीरामजी कुहीरे, बंडु नाना मोरे, उपतालुकाप्रमुख रामराव वरकड, बाळासाहेब देशमुख, अक्षय दीप वाघमारे, भगवानराव गायकवाड, विलास राठोड,दलित आघाडी तालुकाप्रमुख दिलीपराव हिवाळे, पप्पू शेठ दायमा, दलित आघाडी उपजिल्हाप्रमुख नितीन मोरे, सतीश देशमुख, पांडुरंग बोराडे, चांद पठाण,माऊली वायाळ, निळकंठ मोरे, विनोद खरात, अमोल विरकर,भगवान बोराडे, विष्णू मोरे , अंगद मोरे, पंकज देशमुख, सईद रहीम, पप्पू बोराडे, विष्णुपंत खराबे, ओमकार सस्ते, जयदेव चव्हाण, संतोष देवकर, इद्रिस कुरेशी, डॉक्टर संतोष पवार, सतीश वायाळ, नाथा दिवटे, व आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## अंधारबनवाडी जि.प. शाळेत उत्साहात प्रवेशोत्सव; विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेशाचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**अंधारबनवाडी (ता. सिल्लोड)** : येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १५ जून रोजी नवीन शैक्षणिक वर्षाचा 'प्रवेशोत्सव' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमीनाथ पाटील महाकाळ हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानेश्वरभाऊ सोनवणे उपस्थित होते. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य दिनेश महाकाळ, कृष्णा महाकाळ, मुख्याध्यापक रवींद्र खांडवे सर, सहशिक्षक संतोष वीर सर आणि अंगणवाडी सेविका वरपे ताई यांची प्रमुख उपस्थिती होती.



शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करून त्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सोमीनाथ पाटील महाकाळ यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे महत्त्व विषद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मुख्याध्यापक रवींद्र खांडवे सर यांनी केले. या उपक्रमामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण होते.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर येथे सोसायटी ऑफ न्यूरो व्हॅस्क्युलर इंटरव्हेन्शन्सच्या ९व्या वार्षिक परिषदेचे (SNVICON 2026) उद्घाटन केले

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव नागपूर,** भारत — सोसायटी ऑफ न्यूरो व्हॅस्क्युलर इंटरव्हेन्शन्सची ९वी वार्षिक परिषद, SNVICON 2026, हिचे आज माननीय केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री, श्री नितीन गडकरी यांच्या हस्ते अधिकृत उद्घाटन झाले. हा प्रतिष्ठित उद्घाटन सोहळा सायंकाळी ६:३० वाजता नागपूर येथील रामदासपेठमधील हॉटेल सेंटर पॉइंटच्या पॅलेसियो हॉलमध्ये** पार पडला .

१२ जून ते १४ जून, २०२६ या कालावधीत होणारी ही प्रमुख वैद्यकीय परिषद, न्यूरोव्हॅस्क्युलर आणि एंडोव्हॅस्क्युलर न्यूरोसायन्सेसच्या वेगाने प्रगती करणाऱ्या क्षेत्रातील




जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावरील उच्च-स्तरीय चिकित्सक, संशोधक आणि नवोन्मेषकांना एकत्र आणले. ही परिषद सोसायटी ऑफ न्यूरो व्हॅस्क्युलर इंटरव्हेन्शन्स (SNVI) आणि नागपूर न्यूरो सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली गेली.

**कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये:**

उद्घाटन:** माननीय केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितांना संबोधित केले आणि मध्य भारतातील अत्याधुनिक वैद्यकीय पायाभूत सुविधा व आरोग्यसेवेतील प्रगतीवर प्रकाश टाकला.

जागतिक शैक्षणिक आदान-प्रदान: २०२६ च्या वैज्ञानिक कार्यक्रमात तीव्र पक्षाघात (अक्यूट स्ट्रोक), धमनीविस्फार (ॲन्युरिझम) आणि धमनी-शिरा विकृती (आर्टेरियोव्हेनस मॅलफॉर्मेशन - AVMs) यांवरील प्रगत उपचारांवर लक्ष केंद्रित करणारी १० विषय-आधारित सत्रे होते .

प्रमुख स्मृतिभाषण: या कार्यक्रमाचे एक प्रमुख आकर्षण म्हणजे प्रोफेसर ल्यूक पिकार्ड स्मृतिभाषण*, जे जर्मनीचे जगप्रसिद्ध न्यूरोइंटरव्हेन्शनल तज्ज्ञ प्रा. रेने चॅपॉट दिले.प्रख्यात प्राध्यापक: या परिषदेत अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इटली आणि दक्षिण कोरिया येथील उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय प्राध्यापकांसोबतच भारतातील अग्रगण्य न्यूरो-इंटरव्हेंशनल तज्ञही उपस्थित होते.

उद्घाटनाच्या पूर्वसंध्येला बोलताना, आयोजन अध्यक्ष डॉ. अनिल करापूरकर आणि आयोजन सचिव डॉ. सतीश लाहोटी म्हणाले, *"SNVICON 2026 चा उद्देश सिद्धांत आणि प्रत्यक्ष न्यूरोइंटरव्हेंशनल सराव यांमधील दरी कमी करणे आहे.

माननीय श्री नितीन गडकरीजी यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन होणे, हे भारतातील एक महत्त्वाचे आरोग्यसेवा आणि वैद्यकीय केंद्र म्हणून नागपूरच्या वाढत्या स्थानावर जोर देते."सुमारे ३०० प्रती निधी हजर होते.

## भाजपा नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली भाजप पनवेल दक्षिण मंडळाची नियोजन बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : भारतीय जनता पार्टी पनवेल दक्षिण मंडळाची महत्त्वपूर्ण नियोजन बैठक श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृह, मार्केट यार्ड, पनवेल येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. भाजप नेते तथा पनवेल महानगरपालिकेचे मा. विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली. बैठकीमध्ये केंद्रातील मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या यशस्वी 12 वर्षांच्या कार्यकाळानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. तसेच वृक्षारोपण अभियान, आंतरराष्ट्रीय योग दिन, आणीबाणी स्मृती दिन, बूथ सक्षमीकरण अभियान आणि पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत



सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना संघटन हेच पक्षाचे खरे सामर्थ्य असल्याचे सांगितले. प्रत्येक शक्तिकेंद्र, बूथ आणि प्रभाग स्तरावर पक्षाची विचारधारा तसेच केंद्र व राज्य सरकारच्या जनहिताच्या योजना प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी अधिक सक्रियपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणी, जनसंपर्क वाढ, नवीन कार्यकर्त्यांचा सहभाग, युवा वर्गाशी संवाद आणि सोशल मीडियाच्या प्रभावी वापराबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. पक्षाच्या प्रत्येक कार्यक्रमामध्ये जनसहभाग वाढविणे आणि भाजपचे विकासाभिमुख नेतृत्व अधिक बळकट करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. बैठकीस पनवेल दक्षिण तालुका अध्यक्ष मंगेश वाकडीकर, मा. पंचायत समिती सदस्य जगदीश पवार, पनवेल दक्षिण मंडळ सरचिटणीस किरण माळी, सुनील गवंडी व प्रफुल्ल पाटील, केळवणे जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष विद्याधर जोशी, गुळसुंदे जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष अविनाश गाताडे, पळस्पे जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष विजय गवंडी, आपटा पंचायत समिती अध्यक्ष संदीप पाटील, केळवणे पंचायत समिती अध्यक्ष सुशील ठाकूर, पोयंजे पंचायत समिती अध्यक्ष मंगेश लबडे, गुळसुंदे पंचायत समिती अध्यक्ष प्रतीक भोईर तसेच पळस्पे पंचायत समिती अध्यक्ष गोरक्षनाथ धुमाळ यांच्यासह मंडळ पदाधिकारी, मोर्चांचे अध्यक्ष व सरचिटणीस, विविध सेलचे पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख, बूथ अध्यक्ष व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत आगामी सर्व पक्षीय कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले. तसेच मोदी सरकारच्या 12 वर्षांच्या विकासयात्रेची माहिती घराघरात पोहोचविण्याचा आणि संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## क्षणिक प्रेम, आयुष्यभराची शिक्षा? पळून लग्नाच्या घटनांवर गंभीर प्रश्न– शुभम रंगारी, समुपदेशक

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी** - आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात प्रेमसंबंध आणि विवाहाच्या संकल्पनांमध्ये मोठे बदल होत आहेत. मोबाईल, सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांमुळे युवक-युवतींमध्ये संपर्क वाढला असला, तरी अनेक ठिकाणी मुली पळून जाऊन विवाह करण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. ही बाब केवळ एका कुटुंबापुरती मर्यादित नसून सामाजिक चिंतेचा विषय बनली आहे.



तज्ज्ञांच्या मते, कुटुंबातील संवादाचा अभाव, पालक आणि मुलांमधील विश्वास कमी होणे, प्रेमसंबंधांविषयी खुल्या चर्चेचा अभाव, तसेच सामाजिक आणि कौटुंबिक दबाव यामुळे काही युवक-युवती टोकाचे निर्णय घेतात. अशा घटनांमुळे अनेकदा कुटुंबांमध्ये तणाव निर्माण होतो, सामाजिक संबंध बिघडतात आणि काही वेळा कायदेशीर गुंतागुंतही निर्माण होते.

समाजप्रबोधनाची गरज अधोरेखित करताना समुपदेशक शुभम रंगारी यांनी सांगितले की, "युवक-युवतींना योग्य मार्गदर्शन, समुपदेशन आणि भावनिक आधार मिळणे अत्यंत आवश्यक आहे. पालकांनी मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद साधावा, त्यांच्या भावना समजून घ्याव्यात आणि विवाहासारख्या महत्त्वाच्या विषयांवर खुल्या मनाने चर्चा करावी. दबाव किंवा भीतीचे वातावरण निर्माण करण्याऐवजी विश्वासाचे नाते निर्माण करणे ही काळाची गरज आहे."तसेच शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि स्थानिक प्रशासन यांनी संयुक्तपणे जनजागृती उपक्रम राबवून युवकांमध्ये कायदेशीर विवाहाचे वय, विवाहाचे सामाजिक परिणाम, शिक्षणाचे महत्त्व आणि आत्मनिर्भरतेबाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.

मुली पळून जाऊन विवाह करण्याच्या वाढत्या घटनांकडे केवळ टीका किंवा दोषारोपांच्या दृष्टीने न पाहता, त्यामागील सामाजिक आणि मानसिक कारणांचा अभ्यास करून संवाद, समुपदेशन आणि योग्य मार्गदर्शनाच्या माध्यमातून सकारात्मक उपाययोजना करणे हीच आजची खरी गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे